+अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपील क्र.६६/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/ ५०५५

दि. ०८/०८/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/६६/२०२३

प्रती,

श्री.विश्वमोहन शर्मा,
अ-१, गोकुळ गार्डन,
विमान नगर
पुणे-४११०१४

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.विश्वमोहन शर्मा (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा आ.क्र.५२६९, दि.२६/६/२०२३ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे. अर्जातील मुद्दा क्र.३,४,५,६ करीता दि.२१/७/२०२३ रोजी भवन रचना विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. भवन रचना विभागाने दि.२४/७/२०२३ रोजी पुन्हा अर्ज इकडील कार्यालयात वर्ग केला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४३६५, दि.२०/७/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २६/६/२०२३ | २६/६/२०२३ | २५/७/२०२३ | २०/७/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपूर्ण, तसेच माहितीसाठी या खात्याकडून त्या खात्यात पाठवून वेळ दवडला जात आहे, असे दि.२७/७/२०२३ रोजी अर्ज (आ.क्र.७४८७ दि.२०/७/२०२३) सादर केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २७/७/२०२३ | २७/७/२०२३ | १९/८/२०२३ | आहे | -- |

अपिलार्थी यांची दि.०७/०८/२०२३ रोजी सकाळी ११.३० वा. अपिल सुनावणी आयोजित करण्यात आली असल्याबाबत दि.०४/०७/२०२३ रोजी दूरध्वनीद्वारे कळविण्यात आले आहे. सदर सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "मला र.रु.४८/- चलन भरण्यास कळविण्यात आले. मी पैसे भरले. तथापि अर्जातील मुद्दा क्र.१ ते ५ अपूरी माहिती व मुद्दा क्र.३ ते ६ माहितीकरीता अर्ज वारसा व्यवस्थापन विभागास पाठविला मुद्दा क्र.३ ची माहिती अर्ज या खात्याकडून त्या खात्याकडे पाठवत वेळ दवडला माहिती दिली नाही. माझी सुनावणी घेऊन मला मी मागविलेली माहिती द्यावी" असे लेखी म्हणणे प्रथम अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी अर्जास दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे दिले आहे.

| मुद्दा.क्र. | माहिती | उत्तर |
|---|---|---|
| १) | श्री.गजानन रमेश शर्मा या सेवकाचे रुजू दि.३०/१०/२००७ ते २०२३ पर्यंत आजतागयात कोणकोणत्या खात्यात व किती कालावधीसाठी काम केले याची सर्व आज्ञापत्रकासहित माहिती मिळावी. | श्री.विश्वमोहन शर्मा यांनी दि.२६/६/२०२३ च्या संदर्भानुसार मागणी केलेली उपलब्ध माहितीची पृष्ठ संख्या अंदाजे २४ आहे. आपणास हवी असलेली २३ x २/- = रु.४८/- पुणे कोषागारात चलनाने भरलेनंतर, त्यांचे झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन दिलेनंतर आपणास उपलब्ध करुन देणेत येईल. |
| २) | श्री.गजानन रमेश शर्मा यांच्या संपूर्ण सेवाकालावधीत त्यांची किती वेळा पदोन्नती झाली त्यची आज्ञापत्रकासहित माहिती मिळावी | वरीलप्रमाणे |
| ३) | श्री.गजानन रमेश शर्मा यांची रुजू दिनांकापासून ते २०२३ पर्यंत या संपूर्ण सेवाकालावधीत त्यांनी किती वेळा नेमणूकीचे खाते वेगळे व प्रत्यक्ष कामाचे खाते वेगळे असे काम केले आहे व किती वर्षे असे केले आहे याबाबतची माहिती मिळावी. | मुद्दा क्र.३ ते ६ ची माहिती वारसा व्यवस्थापना विभागाशी संबंधित असल्याने अर्ज वारसा व्यवस्थापन विभागाकडे वर्ग करण्यात यावे. |
| ४) | श्री.गजानन रमेश शर्मा सन २०१६ ते २०२१ असे एकूण ६ वर्षे भवन खात्यात कामास होते. सन २०२१ पासून वारसा व्यवस्थापन विकास या नावाखाली ते पुन्हा भवन विभागामध्ये कार्यरत आहेत. याबाबत माहिती मिळावी. | |
| ५) | वारसा व्यवस्थापन विभागामध्ये काम करण्याकरिता कोणत्या विशेष शैक्षणिक गुणवत्तेची आवश्यकता आहे, याची माहिती मिळावी. | |
| ६) | भवन विभाग व वारसा व्यवस्थापन विभाग हे एकच खाते अगर वेगवेगळे याची माहिती मिळावी. | |

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागितलेली माहिती २४ पानांकरिता र.रु.४८/- भरुन उपलब्ध करुन देणेबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने च.क्र.१८५३६१ दि.२०/७/२०२३ रोजी र.रु.४८/- भरुन उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपिलार्थी यांनी आस्थापना विभागाकडील माहिती

मिळाली, मात्र श्री.गजानन शर्मा यांचे माहितीनुसार कनिष्ठ अभियंता असलेपासून जून २०२३ अखेर भवनरचना विभागात कार्यरत आहे, त्यांची पदोन्नत्ती होवून देखील खाते बदलत नसल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. खात्यांतर्गत बदल्या व अतिरिक्त पदभार देण्याची कार्यवाही खातेस्तरावर केल्या जातात. माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जामधील मुद्दा क्र.३ व ४ च्या माहितीकरिता भवनरचना विभागाकडे हस्तांतरित करणे उचित ठरले असते. अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान अर्ज वर्ग करावा व माहिती द्यावी अशी सूचना दिली. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग यांनी भवन रचना विभागाकडील उपलब्ध माहिती (मुद्दा क्र.३ व ४) व आस्थापना विभागाकडील उपलब्ध माहिती एकत्रित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे योग्य होईल. ज्या मुद्दयांची माहिती उपलब्ध नाही तसे स्पष्ट नमूद करावे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी मुद्दा क्र.३ व ४ ची माहिती भवन रचना विभागाकडून उपलब्ध करुन घेवून भवन रचना व आस्थापना विभागाकडील उपलब्ध एकत्रित माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच अ.क्र.५ व ६ बाबत नेमकी माहिती जन माहिती अधिकारी यांनी तातडीने द्यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.६६/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

9/8/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.